Scan QR code
to visit...
Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code
to visit...
Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ६३ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.२६ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.



## मागासवर्ग आयोगाकडून होणारे सर्वेक्षण ताबडतोब थांबवा-प्रकाश शेंडगेंची मागणी

### हिंगोलीची सभा उधळवून लावण्याची भाषा करणाऱ्याला जशास तसे उत्तर दिले जाईल

**हिंगोली :** मराठा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावण्यासाठी आणि न्यायालयात मराठा आरक्षण टिकवण्यासाठी मराठा समाज मागास असल्याचे सिद्ध करणे महत्वाचे आहे. दरम्यान, याच पार्श्वभूमीवर सरकारने मागासवर्ग आयोगालासर्वेक्षण करण्यास सांगण्यात आले आहे. त्यामुळे, शुक्रवारी पुण्यात झालेल्या मागासवर्ग आयोगाच्या बैठकीत मराठा समाजासह इतर खुल्या प्रवर्गातील जातींमधील मागासलेपणाचे सर्वेक्षण करण्याचे निश्चित करण्यात आले आहेत. दरम्यान, आता यालाच ओबीसी नेत्यांकडून विरोध होतांना पाहायला मिळत आहे. त्यामुळे, मागासवर्ग आयोगाचा सर्वेक्षण ताबडतोब थांबवा अशी मागणीच ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी केली आहे. तसेच, मराठा समाजाचे मागासलेपण कितीवेळा तपासणार, आणि ओबीसी समाजाचे सर्वेक्षण ताबडतोब थांबवा असेही प्रकाश शेंडगे म्हणाले आहेत. दरम्यान, यावर बोलतांना प्रकाश शेंडगे म्हणाले की, हे सगळं भयानक आहे. मागासलेपण तपासा हे कुणी सांगितले, अशी कुणीही मागणी केलेली नाही. तसेच अशाप्रकारे कोणतेही सर्वेक्षण करण्यात यावे हे ओबीसी समाजाला मुळीच मान्य नाही. अशाप्रकारचे सर्वेक्षण ताबडतोब थांबविण्यात यावे, ओबीसी समाजातून कोणीही पुन्हा आमचे मागासलेपण तपासण्याची मागणी केली नाही. मराठा समाजाचे नेते बाळासाहेब सराटे यांनी न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत अशी मागणी करण्यात आली आहे. ज्यात सध्याच्या ओबीसीत असलेल्या समाजाचे पुन्हा मागासलेपण तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. पण यावर अजून सुनावणी बाकी असून, त्यानंतर जो काही निकाल आहे तो न्यायालयाकडून देण्यात येईल. मात्र, त्यापूर्वीच सरकराने त्याची अमलबजावणी सुरु केली असून, हे सर्वकाही भयानक आहे. त्यामुळे हे ओबीसी समाजाला मुळीच मान्य नाही, असे प्रकाश शेंडगे म्हणाले. तर पुढे बोलतांना प्रकाश शेंडगे म्हणाले की, मराठा समाजाचे मागासलेपण तुम्हाला पुन्हा तपासायचे असेल तर त्याला आमची कोणतेही हरकत नाही. परंतु त्या अगोदर मागील १० वर्षांपासून १३० जातींचा सर्वेक्षण करणे बाकी आहे. आधी या १३० समाजाचे मागासलेपण तपासले पाहिजे. मराठा समाजाचे मागासलेपण आता आणखी कितीवेळा तपासणार आहे. आता ही चौथी-पाचवी वेळ आहे, मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याची. त्यामुळे मागासवर्ग आयोग राज्य सरकारच्या हातातलं बाहुल बनत असेल तर त्याला आमचा विरोध असणार आहे, असेही प्रकाश शेंडगे म्हणाले. ओबीसीमधील गरीब समाजाच्या आरक्षणावर डल्ला मारण्याचा आधीच प्रयत्न सुरु आहे. आम्हाला कुणबी प्रमाणपत्र द्या आणि आमचा समावेश सरसकट ओबीसीत करा असा हा प्रकार आहे. त्यामुळे यालाच विरोध करण्यासाठीच सर्व ओबीसी समाज एकत्र येत आहे. आमच्या आरक्षणाला धक्का लावू नयेत अशी मागणी हा गरीब समाज करत असून, यासाठी ही सभा होत आहे. तरीही ही सभा उधळून लावण्याची भाषा होत असेल, तर महाराष्ट्रात हे बिलकुल खपवून घेतले जाणार नाही. तसेच आमच्या ओबीसी कार्यकर्त्यांकडून सभा उधळवून लावण्याची भाषा करणाऱ्याला जशास तसे उत्तर दिले जाईल, असेही प्रकाश शेंडगे म्हणाले.

## मतदारसंघाच्या विकासासाठी सतत कार्यरत राहीन-आ.प्रतिभाताई धानोरकर

### भद्रावती तालुक्यातील विकास कामांचे भुमीपूजन व लोकार्पण सोहळा





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मी माझ्या ४ वर्षांच्या कार्यकाळात वरोरा - भद्रावती मतदारसंघातील विकासासाठी कटिबद्ध राहिली आहे. या काळात अनेक विकास कामे पूर्ण झाली आहेत. या कामांमुळे तालुक्यातील नागरिकांना अनेक सुविधा मिळाल्या आहेत. यापुढेही मी तालुक्यातील विकासासाठी सतत कार्यरत राहीन, असे प्रतिपादन वरोरा - भद्रावती मतदारसंघाच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केले. भद्रावती तालुक्यातील विविध गावांमध्ये भुमीपूजन व लोकार्पण सोहळा दौरा पार पडला. यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी भद्रावती काँग्रेस तालुका अध्यक्ष प्रशांत काळे, भद्रावती काँग्रेस शहर अध्यक्ष सुरज गावंडे, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद मगरे, बाळू चिंचोलकर, भानुदास पा.गायकवाड, भोजराज जी झाडे, सुधीर मुडेवार, अनिल चौधरी, मंगेश मत्ते, ईश्वर पा. धांडे, भगवान काकडे, किशोर पडवे, नयन जांभुळे, चांगदेव रोडे, सलाम शेख, संजय उताणे, संजय काकडे, दिलीप चौधरी, प्रशांत झाडे, आकाश ढवस यांची उपस्थिती होती. मानोरा ते धानोली रस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरण, किन्हाळा, आष्टा, घोसरी, टेकाडी, काटवल तु., विलोडा, काटवल न., चोरा, आष्टी का., मासळ व चिंचाळा येथे विविध विकास कामांची पाहणी केली व लोकार्पण केले.या दौऱ्यात त्यांनी मानोरा ते धानोली रस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरणाचे काम पूर्ण झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यामुळे वाहतुकीची सोय सुलभ झाली आहे. त्यांनी किन्हाळा, आष्टा व घोसरी येथे वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण झाल्याबद्दलही समाधान व्यक्त केले. या योजनेमुळे या भागातील पाणीटंचाई दूर होण्यास मदत होणार आहे.तेकडी, काटवल तु., विलोडा, काटवल न., चोरा, आष्टी का., मासळ व चिंचाळा येथे सिमेंट कॉकीट रस्त्याचे काम पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यामुळे या भागातील वाहतुकीची सोय सुलभ झाली आहे. त्यांनी या कामांसाठी संबंधित ग्रामपंचायत व ग्रामस्थांना धन्यवाद दिले.या दौऱ्यादरम्यान त्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांनी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.



## खेळ खेळल्याने ताणतणाव नष्ट होतात : वैभव वाघमारे

### पेरमिली येथे प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन संपन्न



**आलापल्ली । प्रतिनिधी**

स्पर्धा हे कोणत्याही कोणत्याही सभ्यतेचा विकसित झाल्याचे लक्षण आहे.ज्या सभ्यता खेळामध्ये पुढे असतात ते इतर बऱ्याच गोष्टींमध्ये पुढे असल्याचं प्रामुख्याने दिसतं त्यासोबतच शाळेच्या अनुषंगानी खेळ खेळल्याने ताणतणाव नष्ट होतात आणि त्याच्यामुळे मुलं एकाग्रपणे अभ्यासमध्येही पुढे जाऊ शकतात असे प्रतिपादन अहेरीचे प्रकल्प अधिकारी वैभव वाघमारे यांनी केले.ते पेरमिली येथील शासकीय आश्रम शाळेत सुरू असलेल्या प्रकल्प स्तरीय क्रीडा संमेलनात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.यावेळी उदघाटक म्हणून पेरमिली चे माजी सरपंच प्रमोद आत्राम,सह उदघाटक म्हणून पोलीस उपनिरीक्षक धनराज कोळी,सीआरपीएफ चे व्ही.पी.नरेंद्र सर,विशेष अतिथी म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक वाघाडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवलेश आत्राम, सहाय्यक प्रकल्प अधिकारी (प्रशासन) एस डी वसावे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) एस पी डोंगरे,वरिष्ठ आ.वि. वि.मट्टामी, मुख्याध्यापक एस बी मवलीकर,शा. व्य. समिती सदस्य रंजिता मुडावार,ग्रा.प सदस्य सपना बंडमवार तसेच इतर मुख्याध्यापक उपस्थित होते.पुढे बोलताना शालेय जीवनात शिक्षणासोबत खेळही तेवढेच महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांनी प्रत्येक स्पर्धेत भाग घेतले पाहिजे. स्पर्धेत प्रत्येक जण जिंकण्यासाठीच भाग घेत असतात मात्र दोन पैकी एकच संघ कोणता संघ कश्या पद्धतीने खेळला याला जास्त महत्व असते.चांगला खेळ खेळुनही आपण कधी कधी अटीतटीच्या सामन्यात हार पत्करावा लागतो.त्यामुळे खचून न जाता खेळामध्ये सातत्य ठेवण्याचे काम केले पाहिजे.असा विध्यार्थी खेळाडूंना त्यांनी मोलाचा मार्गदर्शन केला.एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अहेरी अंतर्गत खमनचेरू, जिमलगट्टा, मुलचेरा आणि बामणी या चार केंद्रातील ६८७ विद्यार्थी या क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला असून २५ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर पर्यंत याठिकाणी वैयक्तिक आणि सांघिक खेळ खेळले जाणार आहे. यातील उत्कृष्ट खेळाडूंना विभागीय स्तरावर संधी मिळणार असल्याने सर्वच खेळाडू आपले क्रीडा कौशल्य दाखविण्यासाठी सज्ज झाल्याचे दिसून आले. मान्यवरांच्या उपस्थितीत मुलचेरा आणि खमनचेरू या दोन चमू मध्ये १७ वर्षीय वयोगटातील कबड्डी सामना रंगला.उदघाटनिय सामन्यात अत्यंत चुरशीची लढत झाली असून मुलचेरा संघाने बाजी मारली.

## भक्तिमार्ग हा सामाजिक विषमता नष्ट करून एकात्मता प्रस्तापित करणारा मार्ग

### ह.भ.प.माणिक रोकडे; जैतापूर येथे कार्तिकी एकादशी निमित्य कीर्तन महोत्सव

**राजुरा । प्रतिनिधी**

जैतापूर येथे श्री गुरुदेव दत्त मंडळाच्या वतीने कार्तिकी एकादशी निमीत्य मागील तीस वर्षापासून दोन दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. (दि. २४) रोज शुक्रवारला आयोजित गोपाल काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. माणिक रोकडे महाराज यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील सर्व संतांनी श्री विठ्ठलाच्या निर्गुण आणि सगुण रूपाचे, भक्तीचे, प्रेमाचे, शरणागत वत्सलतेकच्या अनुभूतीचे वर्णन आपल्या काव्यातून केले आहे. विठ्ठल हा अनाथांचा नाथ आहे. संसारातील चिंतानी ग्रस्त झालेल्यांचा आधार आहे. भक्ती मार्गातून सामाजिक विषमता नष्ट करून सामाजिक एकात्मतेचे, समरसतेचे प्रस्थापन करणारा मार्ग आहे. 'भक्तीचे प्रतिपादन गीतेत केले आहे. 'भक्तीचे' महत्त्व अधिक विस्ताराने प्रतिपादन करण्यासाठी सर्वसामान्य माणसाला समजण्यासाठी महर्षी श्रीव्यासमुनींनी 'श्रीमद्भागवत' रचना केली. संतांनी ओवी अभंगाच्या माध्यमातून ती 'भक्तीतत्त्वे' सामान्य माणसापर्यंत पोचविन्याचे काम करीत असल्याचे सांगितले आहे.मागील तीस वर्षाची परंपरा कायम सुरू ठेवत जैतापूर येथिल श्री गुरुदेव दत्त मंडळ व जैतापूर ग्रामवसी दोन दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करीत असते. यात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करून कीर्तन महोत्सव मोठ्या उत्साहात पार पाडत आहे. यात युवकिर्तनकार ह. भ. प. दत्ता मसे, रामचंद्र गोहोकार, यादवराव तुंबडे यांचे कीर्तन झाली. सोबत हार्मोनियम वादक रामचंद्र झाडे, भवन चौधरी, मृदंग वादक मुंजा रासवे, भाऊराव चतुरकर, गायक वसंता बोबडे, हेमंत तेजने, वरोरा येथील राजु बकाने, बंडू पिंपळकर, निशंत खंगार, गणपत आवारी याचा सहभाग होता. सद्गुरू नामदेव रोकडे यांच्या पालखी सोहळ्यात बाहेर गावच्या दिंड्या व भजन मंडळींचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.या कार्यक्रमाला श्री गुरुदेव दत्त मंडळाचे विलास खारकर, संतोष धांडे, प्रविण थेरे, प्रदीप गोरे, भास्कर फोफरे, सुनील खारकर, शंकर गोरे, साईनाथ आत्राम, सदाशिव फोफरे, मुरलीधर थेरे, सुधाकर गोरे, मनोहर धांडे, ज्ञानेश्वर बेरड, पुरुषोत्तम गोनेवार, लटारी धांडे, संतोष उरकुंडे, दौलत धांडे, पुरुषोत्तम निब्रड, जयप्रकाश बेरड, दादाजी धांडे, मारोती फोफरे, श्रीहरी धांडे, मारोती आत्राम, देवराव धांडे, गणपत मडावी, हरी निब्रड, अंकुश चीने, शंकर लोनगाडगे, शालिक बेरड, प्रफुल थेरे, बाळा बेरड, अशोक खुसपुरे, पवन हनुमंते सह जैतापूर ग्रामवासियांनी सहकार्य केले



## संपादकीय

## अनमोल 'घडी'...




गाणी गुणगुणायला सर्वांनाच आवडते; मात्र गाण्याचा मुखडा तेवढा म्हणता येतो. गीतातील पुढील ओळी मात्र सर्वांच्या पाठ नसतात. मनोरंजनाच्या आत्तासारख्या सोयी उपलब्ध नव्हत्या, त्या सत्तरच्या काळात देखील आपल्याला गाणी पाठ असावीत. मित्रमंडळींपुढे ती म्हणता यावीत, असे अनेक तरुणांना वाटत असे.गाणी ऐकण्यासाठी रेडिओ हेच एकमेव माध्यम. टेपरेकॉर्डर त्यावेळी दृष्टिक्षेपात आला नव्हता. आवडीचे गाणे लागल्यावर हे तरुण वही-पेन घेवून गाणी लिहिण्याचा प्रयत्न करीत. पण लिखाणाचा आणि गाण्याचा वेग यांचा मेळ कधीच जुळत नसे.मग हे तरुण कुठे पूर्ण गाणे मिळेल, याचा शोध घेत असत. त्या काळी पुण्यातील मिनर्व्हा, आर्यन, श्रीनाथ, श्रीकृष्ण, डेक्कन या चित्रपटगृहांच्या बाहेर गाण्यांच्या या घडी-पुस्तिका किंवा पद्यावली विक्रीला ठेवून विक्रेते पथारी मांडून बसलेले असत.वर्तमानपत्रासारख्या कागदावर या पुस्तिका छापलेल्या असत. कधीकधी त्या काळ्याव्यतिरिक्त अन्य रंगातही असत. त्याच्या घड्या घालून हातात मावेल एवढ्या आकाराच्या त्या पुस्तिका तयार होत.अगदी जुन्या चित्रपटापासून ते त्या काळातील अलीकडील चित्रपटांची गाणी या पुस्तिकात उपलब्ध होत. या पुस्तिकांची किंमत दहा पैशांपासून पंचवीस पैशांपर्यंत असे. एका पुस्तिकेत सरासरी आठ गाणी असत.एकाच चित्रपटातील गाणी त्यात असत. गाण्याचे गीतकार, संगीतकार, गायक यांचाही उल्लेख गाण्याखाली असे. मुखपृष्ठावर त्या चित्रपटाचे नाव आणि हिरो-हिरोईनची ब्लॉकमधील चित्रे असत.तरुण आपल्या आवडत्या चित्रपटाच्या गाण्याचे पुस्तक घेत आणि ती गाणी पाठ करून म्हणत. काहीजण ही गाणी वहीतही लिहून ठेवत. 'आनंद' चित्रपटात राजेश खन्ना आपल्या वहीत लिहिलेली कविता म्हणतो, त्याप्रमाणे वहीत पाहून गाणी म्हटली जात. ज्यांना पूर्ण गाणे पाठ असे त्यांना अधिक भाव मिळे. अनेकांनी अशा पुस्तिकांचा संग्रह केलेला असे. एकमेकांना त्यांची देवाणघेवाणही चाले.या विक्रेत्यांकडे हिरो आणि हिरोईनचे फोटोसुद्धा विक्रीसाठी असत. पोस्टकार्डसाइज फोटोंना विशेष मागणी असे. हे फोटो पंचवीस ते पन्नास पैशांत मिळत. अनेक महाविद्यालयीन मुले ते जमा करीत असत.आज गुगलवर एखाद्या गाण्याची ओळ जरी टाईप केली तर ते गाणे क्षणार्धात मिळते. संपूर्ण गाणेच नाही तर चित्रपट देखील युट्युबवर पाहता येतो. आवडीचे गाणे शोधण्यासाठी त्या काळी तरुण महिनोन्महिने शोध घेत असत. आताच्या पिढीला हे आता खरेदेखील वाटणार नाही. आवडत्या गाण्यांच्या पुस्तिका मिळवण्यासाठी केलेली त्यावेळेची पायपीट आठवते आणि नकळत आवडीच्या गाण्याची ओळ ओठावर येते.या गाण्यांच्या घडीपुस्तिका माझे अनेक मित्र जमा करीत असत. एकमेकांना देतही असू. कधीकधी दुर्मीळ खजिना हाती लागे. अगदी जुनी गाणी अनायसे मिळत असत. फोटोकॉपी म्हणजेच झेरॉक्सचा अजून म्हणावा तसा वापर सुरू झालेला नव्हता.त्यामुळे वहीतच ही गाणी लिहून घेत ही पुस्तिका अनेकांकडे फिरत असे. या पुस्तिकांमुळे आमची अनेक गाणी त्याकाळी पाठ झाली होती. प्रत्येक जण आपापल्या भसाड्या का होईना आवाजात गायनाचा आनंद लुटत असत.काहीजण गाण्यांची पुस्तके विकत घेत असत. ही पुस्तके प्रामुख्याने रेल्वे स्टेशनवर मिळत; पण त्यांची किंमत अधिक असे. 'पॉकेट बुक्स'च्या आकारातील ही पुस्तके आम्हाला पाहायला मिळाली तरी आनंद होत असे.आधुनिकीकरणाच्या रेटच्याने, टेपरेकॉर्डरच्या जमान्याने हळूहळू या पुस्तिकांची निर्मिती आणि विक्री थांबत गेली. आता तर फक्त दुर्मीळ वस्तूंच्या प्रदर्शनातच या पुस्तिका पाहायला मिळतात.

## नक्षलवाद्यांनी केली युवकाची हत्या

## दक्षिण गडचिरोलीत नक्षल्यांनी केली महिनाभरात तिघांची हत्या

**गडचिरोली**-पोलीस खबऱ्या असल्याच्या संशयावरून नक्षलवाद्यांनी आणखी एका तरुणाची गोळ्या झाडून हत्या केल्याने खळबळ उडाली आहे. रामजी आत्राम (२७, रा. कापेवंचा ता. अहेरी) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव असून घटनास्थळी आढळलेल्या नक्षल पत्रकात तो खबऱ्या असल्याचा दावा केला आहे.दक्षिण गडचिरोली भागात महिनाभरात नक्षलवाद्यांनी तिघांची हत्या केल्याने परिसरात दहशतीचे वातावरण आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून, २४ नोव्हेंबर रोजी अहेरी तालुक्यातील राजाराम खांदला पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असलेल्या कापेवंचा येथील रहिवासी असलेला रामजी हा तरुण आपल्या शेतात काम करीत होता. दरम्यान, संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास काही सशस्त्र नक्षलवाद्यांनी त्याठिकाणी जाऊन गोळ्या झाडून त्याची हत्या केली.

# संविधानामुळे डॉ. बाबासाहेबांचा जगभर गाजावाजा




भारताच्या 'घटने'त (संविधान) काय नाही हे पाहण्यापूर्वी काय आहे हे पाहिले पाहिजे.आम्हाला लोकशाहीप्रधान प्रजासत्ताक राज्य निर्माण करावयाचे होते. जाती, वंश, लिंग, धर्म वगैरेचा विचार न करता प्रत्येक व्यक्तिला राजकारणात समान हक्क द्यावयाचे होते. ते या 'घटने'त नाहीत असे कोण म्हणते ? प्रत्येक व्यक्ति राजकिय हक्काच्या बाबतीत समान आहे व तिला आपले संरक्षण केले जाण्याचा हक्क आहे असे जे म्हटले आहे त्याला घटने'त कोठेही बाधा आलेना नाही. प्रत्येक वयात झालेल्या स्त्री-पुरुषात मताचा हक्क आहे. समान संधी, समान नोकऱ्या, समान पगार मिळण्याची तरतूद घटनेत केली आहे.कोणतीही घटना (संविधान) परिणामक्षम होण्याकरता पुरेसा लवचिकपणा असावा लागतो राज्यावर संकटे आली म्हणजे सारी सत्ता मध्यवर्ती सत्तेला आपल्या हातात घेता आली पाहिजे. त्याशिवाय देशाचे रक्षण होत नाही. एखादा प्रांत बंडखोर झाला आणि त्याला तशी स्वायतता असली तर एका राज्यात दोन राज्ये निर्माण होऊ शकतील. ती देशविच्छेदनाची एक योजनाच होईल, ते या घटनेत टाळले आहे. त्याचप्रमाणे घटनेत काही इष्ट अपरिहार्य दुरुस्त्या कराव्या असे वाटले तर ते ही करण्याची व्यवस्था घटनेत आहे. अर्थात ही दुरुस्ती करणे तितके सोपे ठेवले नाही.१९५० साली अमलात आलेले भारतीय संविधान मुख्यत्वे १९३५ च्या भारत सरकार कायदा १९३५ वर आधारित आहे. १९३५ सालच्या या कायद्यान्वये भारताच्या अंतर्गत स्वशासनाचा पाया घातला गेला होता. ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट टली यांच्या शिष्टमंडळाच्या स्वतंत्र भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यासाठी एका मसुदा समितीच्या स्थापनेविषयीच्या कल्पनेस भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या नेत्यांनी सहमती दर्शविली होती. १९४६ च्या उन्हाळ्यात या समितीची स्थापना झाली व तिची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथील संविधान सभागृह मध्ये पार पडली की, जे आज सेंट्रल हॉल या नावाने परिचित आहे.पहिल्या बैठकीला ९ महिलांसह एकूण २०७ सदस्य उपस्थित होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतास स्वातंत्र्य मिळाल्यावर अल्पकाळ या समितीने भारताचे प्रतिनिधी रूपात काम केले होते.२९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसूदा समिती स्थापन झाली. अनेक बैठकांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारला गेला. यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली भारतीय राज्य घटनेत ३९५ कलमे व ८ परिशिष्ट्ये आहेत. आजच्या घडीला भारतीय घटनेत ४४८ कलमे, २५ भाग, १२ परिशिष्ट्ये, ५ पुरवण्या आहेत. भारतीय घटनेत वेळी प्रसंगी दुरुस्तीची तरतूद असल्यामुळे आतापर्यंत ९८ वेळा दुरुस्ती करण्यात आली आहे. म्हणून काही कलमे वाढली आहेत याची नोंद घ्यावी. ही घटना लिहिण्यासाठी दोन वर्षे अकरा महिने आणि सतरा दिवस लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांना सहा लोक सहकारी दिले होते.परंतू, सहाही सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घटना लिहिण्यासाठी कसल्याही प्रकारे मदत केली नाही. त्यामुळे घटना लिहिण्याचे कार्य एकट्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना करावे लागले आणि त्यानंतरच भारतीय घटना दि. २६ नोव्हेंबर १९४९ ला घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांना सुपूर्द केली. ही भारतीय राज्य घटना दि. २६ जानेवारी १९५० रोजी या देशात अंमलात आली तेव्हापासुन देशात प्रजासत्ताक राज्य सुरु झाले. या भारतीय घटनेची विशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.भारतीय राज्य घटना (संविधान) म्हणजे ज्या ग्रंथात देश कसा चालवावा या विषयी कायदे-कानुन आणि प्रत्येक घटकाचे अधिकार कर्तव्य इत्यादी गोष्टी ज्यामध्ये नमुद केले आहे त्याला (संविधान) भारतीय राज्य घटना म्हणतात. हा एक सामाजिक सिध्दान्त आहे. भारतीय घटनेने प्रत्येकाला जीवन जगण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. कोणतीही जात,लिंग, रुढी, परंपरा कोणत्याही व्यक्तीला त्याच्या जीवीत स्वातंत्र्याच्या आड येऊ शकणार नाही. जर तसा प्रयत्न केला तर ती व्यक्ती किती मोठी असली किंवा मोठ्या पदावर असेल तरी त्या अन्याय अत्याचार करणार्या व्यक्तीला भारतीय घटनेने दोषी ठरविले आहे आणि त्याला शिक्षा करण्याची तरतूद आहे.भारतीय राज्य घटना कधी ताठर आहे तर कधी लवचिक आहे. वेळी प्रसंगी घटनेत नवीन कायदे समाविष्ट करण्याची तरतूद आहे देशात कधी आराजकता माजली तर आणीबाणी पुकारण्याची तरतूद घटनेत केलेली आहे. कारण अराजकतेमुळे देशाची वित्तहानी, प्राणहानी होते, जाळपोळ-दंगली घडतात. हे टाळण्यासाठी बंडखोर, चिथावणी



प्रविण बागडे
नागपूर
मो : ९९२३६२०९१९

घातक ठरणारी आंदोलने बंद करण्याची तरतूद घटनेत आहे.भारतीय राज्य घटनेमुळे हजारो वर्षाची धर्मावर आधारलेली विषम व अमानवी समाज व्यवस्था नष्ट केली व समता, स्वातंत्र्य बंधुता व न्याय या मानवतावादी तत्त्वावर आधारित समाजव्यवस्था या भारतात स्थापन झाली आहे. एवढी समाज बदलाची ताकद घटनेत आहे.भारतीय घटनेत स्त्री-पुरुष जातपात असा भेद न ठेवता सर्व व्यक्ती समाज आहेत हे भारतीय समाजाला भारतीय घटनेने शिकविले आहे. तसे कायदे व तरतूदी घटनेत समाविष्ट केल्या आहेत. आज भारतीय समाजाला व देशाला जगात आदर्श राज्य घटनेमुळे मान-सन्मान प्राप्त झाला आहे. हा देश अमानवी वर्ण व्यवस्था जातीभेदामुळे जगात आपला देश बदनाम झाला होता.भारतीय राज्य घटना मानवी मुल्य जपणारी असल्याने आज जगाला मार्गदर्शन करीत आहे. या भारतीय घटनेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सारे जग कौतुक करीत आहे. जगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौध्दिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व मानवता या क्षेत्रात अग्रगण्य स्थान दिले आहे.भारतीय घटनेमुळे डॉ. बाबासाहेबांचे जातीयतेविरुध्दचे कार्य आधुनिक मानवाला विषमतावादी विचारांना समतावादी विचाराकडे नेणारा प्रबोधनाचा मार्ग बनले आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगाचे गुरु बनले आहेत. युग बदलणारा, समाज बदलणारा, जग बदलाची ताकद असणारा महामानव म्हणून त्यांना जगाने पूज्यनीय मानले आहे.भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी हा देश अनेक छोट्या छोट्या राज्यात संस्थानांमध्ये विखूरलेला होता. या देशात अनेक जाती-जमाती होत्या, अनेक धर्म पंथांमध्ये हा देश विभागला होता. आपआपसात मतभेद होते. राज्य सिमावाद होता. या वातावरणात देशात एकता आणि अखंडता, बंधुता निर्माण करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटनेच्या माध्यमातून केलेले महान कार्य आहे. भारतात २९ घटक राज्ये, ७ केंद्रशासित प्रदेश आहेत. तसेच विविध जाती धर्माचे लोक रहात आहेत. या सर्वांमध्ये एकता निर्माण झाली ती केवळ भारतीय राज्य घटनेमुळे.कलम १४ नुसार भारतातील सर्व व्यक्तीस समानतेचे संरक्षण देण्यात आले आहे. जातपात किंवा वर्ग, वर्ण असा भेदभाव केला जाणार नाही.कलम १६ प्रमाणे सार्वजनिक सेवा योजनांमध्ये समान संधी देण्यात आली आहे. कोणताही भेदभाव केला जाणार नाही.मुलभुत हक्काच्या बाबतीतही घटनेत व्यवस्था आहे मात्र राष्ट्र संकटात सापडले मगर कोणाही व्यक्तिला केवळ स्वातंत्रय दिले आहे व तो त्याचा दुरुपयोग करीत आहे असत वाटले तर ते स्वातंत्रय अबाधित राहणार नाही व्यक्तिला समानतेचे, धार्मिक आचार-विचार प्रचाराचे, शिक्षणच मिळण्याचे वगैरे हक्क दिले आहे. त्याचप्रमाणे व्यक्तीला पुरेशी जीवनाची साधने उपलब्ध व्हावती, संपत्तीची वाटणी समान व्हावी, सारख्या कामाकरता सारखा पगार मिळावा, लहान मुलांच्या व प्रौढांच्या प्रमाणे नागवणूक होऊ नये. प्रत्येकाला काम मिळण्याचा हक्क प्राप्त व्हावा, १४ वर्षापर्यंत प्रत्येकाला मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे, रोजगार धंद्याचे वातावरण चांगले असावे, रजेचा काळ त्याला चांगला उपभोगता यावा. त्याला सामाजिक व सांस्कृतिक संधी मिळाली. वगैरे बाबत सरकारने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे.ही घटना सावधगिरी बाळगण्याच्या दृष्टिने जितकी सुदृढ करता येईल तितकी केली आहे. सध्याचा काळ सुरक्षितेचा नसल्यामुळे त्याला अनुसरुन ही घटना केली असल्यास ते दोषस्पद नाही. अशाप्रकारे तयार केलेल्या घटनेचे आपण स्वागत केल पाहिजे. या घटनेने दोष असलेच तर ते फाजील सावधगिरी बाळगण्याचे दोष आहेत. ते अपरिहार्य ही आहेत. त्यामुळे आपली वाढ, विकास किंवा प्रगती होण्यास कोणतीही अडचण येणार नाही. राजकारणात आपल्याला समता मिळाली आहे, पण सामाजिक व आर्थिक जीवनात राजकारणात दरडोई एकमत आणि एका मताचे एक मूल्य हे तत्व करीत आहो पण सामाजिक, आर्थिक जीवनात आपल्या विशिष्ट सामाजिक समाजरचनेमुळे, व्यक्ती मूल्याचे हे तत्वपूर्वी प्रमाणेच नाकारले जाणार आहे.भारतीय संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान देशाला अर्पण करण्याच्या एक दिवस आधीचे संविधान सभेतील शेवटचे भाषण.आपल्या भाषणात ते म्हणाले, मी या ठिकाणी घटनेच्या गुणवर्णनात शिरत नाही घटना कितीही चांगली व निर्दोष असली तरी ती जर अमलात आणणारे नालायक व निरुपयोगी असेल तर तीच घटना वाईट ठरेल. त्याचप्रमाणे घटना कितीही वाईट असली तरी ती राबवणारे चांगले असतील तर ती चांगली ठरेल. राज्यघटनेच्या स्वरुपावर तीची अंमलबजावणी अवलंबून असते. कायदेमंडळ, मंत्रीमंडळ, व न्यायधीश अशा सारखी राज्याची प्रमुख अंगे पुरविण्याचे काम राज्यघटना करीत असते. या राज्याच्या अंगाची अंमलबजावणी या घटकांवर अवलंबून असते ते घटक म्हणजे जनता व देशातील राजकिय पक्षोपक्ष हे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात स्वतंत्र्य भारताच्या स्वातंत्र्याच्या संरक्षणाविषयी लोकशाही प्रधान राज्यघटनेच्या सुरक्षिततेविषयी आणि लोकशाहीच्या जोडीला स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व जीवनमुल्यांवर आधारित सामाजिक लोकशाहीला अत्यंत महत्वाचे स्थान देण्याविषयी जे बहुमुल्य विचार व्यक्त केले, ते मार्गदर्शन आहेत.संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरुषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत. आयरीश देशभक्त डॅनियल ओकॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करुशकत नाही, कोणतीही स्त्री स्वत:च्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करुशकत नाही आणि कोणताही देश स्वत:च्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही. इतर देशांच्या तुलनेत भारताला सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे, कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही राजकारणात दिसणार नाही, इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अध:पतन आणि अंतिमत: हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.आपल्या राष्ट्रातील श्रेष्ठ नेते व कायदेपंडीत यांनी उभारलेली घटनेली ही भव्य इमारत भारताच्याच काय, पण जगाच्या कौतूकाचा विषय झाल्याशिवाय राहणार नाही, हे ही तेवढेच खरे. संविधान गौरव दिनाच्या सर्वांना शुभेच्छा !

# शस्त्रसंधीची तिरीप

इस्त्राईल-हमास यांच्यात सुमारे सहा आठवड्यांपूर्वी सुरू झालेल्या युद्धाच्या भडक्याने गाझा पट्टीचा बराच भाग बेचिराख करून टाकल्यानंतर का होईना तात्पुरत्या शस्त्रसंधीचे शहाणपण दोन्ही बाजूंना सुचले, हेही नसे थोडके.आता याचे रूपांतर कायमस्वरूपी शांततेत व्हावे, यासाठी सर्वंकष प्रयत्न व्हायला हवेत. युद्धाचे उद्दिष्ट काय होते आणि प्रत्यक्षातील कारवाईचे स्वरूप काय, हे पाहिले तर त्यातील तफावत चटकन लक्षात येते.हमाससारख्या दहशतवादाचा मार्ग स्वीकारणाऱ्या संघटनेचे कंबरडे मोडलेच पाहिजे, यात दुमत नाही. परंतु युद्धाच्या ज्वाळा सगळेच भस्मसात करीत निघाल्या आहेत. हमासने सात ऑक्टोबर रोजी इस्त्राईलवर केलेल्या हल्ल्याने बाराशे लोकांचा बळी घेतला;प्रत्युत्तरादाखल इस्त्राईलने हमासविरोधात गाझा पट्टीत उघडलेल्या मोहिमेने आतापर्यंत चौदा हजारांवर पॅलेस्टिनींचा बळी घेतला आहे. या भागातील तेवीस लाखांपैकी सतरा लाखांवर नागरिक विस्थापित झाले आहेत.इस्त्राईल आणि पॅलेस्टाईन या दोघांच्याही समर्थकांनी युद्धविरोधी मोहिमा उघडलेल्या आहेत. हमास त्यांच्या ताब्यातील पन्नास इस्त्राईली नागरिकांची सुटका करणार आणि त्या बदल्यात इस्त्राईल त्यांच्या तुरुंगातील दीडशे पॅलेस्टिनी महिला, मुलांची सुटका करणार आहे.चार दिवसांत ही प्रक्रिया पार पडत असतानाच इजिप्तमधून गाझामध्ये शेकडो ट्रकद्वारे गाझावासीयांना औषधे, अन्नधान्य, इंधन यांच्यासह जीवनावश्यक साहित्य पुरवठ्याचा मार्ग खुला केला जाईल.हमासने आणखी अपहृतांच्या सुटकेची तयारी दाखवली, तर दहा व्यक्तींमागे एक दिवस याप्रमाणे शस्त्रसंधीचा अंमल वाढवला जाईल. इस्त्राईल-हमास संघर्षाने टोकाचे रूप घेतले असताना झालेल्या तात्पुरत्या शस्त्रसंधीने विचारविमर्शाला आणि थंड डोक्याने भविष्यातील योजना आखण्याला उभय बाजूंना अवधी मिळेल, हे खरे.ही शस्त्रसंधी पूर्णविराम देणारी नसली तरी उभयतांमध्ये विश्वासाचे, समजुतीचे वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल म्हणता येईल. तथापि, त्याला व्यापक रूप द्यायचे की पुन्हा येरे माझ्या मागल्या करायचे हेदेखील यातील दोन्हीही बाजूंवर अवलंबून आहे.हमासने इस्त्राईलवर केलेला दहशतवादी हल्ला अत्यंत निंदनीय आहे. त्याचे कधीच कोणीही कदापिही समर्थन करणार नाही. त्याला इस्त्राईलने दिलेले प्रत्युत्तर हा एका मर्यादेतच स्वसंरक्षणाचा भाग मानता येईल.हमासला नेस्तनाबूत करण्याचा त्याचा इरादाही अमान्य करता येणार नाही. तथापि, हमासला धडा शिकवताना निष्पाप पॅलेस्टिनी नागरिकांचा इस्त्राईलने बळी घेणे, गाझा पट्टीतील रुग्णालये भुईसपाट करणे, तेथील नागरिकांचे अन्नपाणी तोडणे आणि युद्धविषयक संकेतांची कोणतीही पत्रास न ठेवता सर्वसामान्य नागरिक, रुग्ण, महिला-मुलांना लक्ष्य करणे, त्यांचा बळी घेणे हे हीन कृत्यच म्हटले पाहिजे.त्यामुळेच सुरुवातीला हमासच्या हल्ल्यामुळे इस्त्राईलमागे जगभरातून उभे राहिलेले जनमत विरोधात जाऊ लागले. इस्त्राईलसह अमेरिका, युरोपातील अनेक देशांसह संयुक्त राष्ट्रांतही मानवतेच्या भूमिकेतून गाझातील पेच सोडवा, हीच भूमिका व्यक्त होत आहे.या जनमताच्या रेट्याला अनुकूल अशी घटना हमासने ओलिसांच्या सुटकेच्या घेतलेल्या निर्णयाने घडत आहे. खरेतर हमासने इस्त्रायलींना ओलिस ठेवण्यासाठी केलेल्या अपहरणनाट्यापासूनच सुटकेच्या प्रयत्नांना प्रारंभ झालेला होता.कतारने त्यात पुढाकार घेतला; मग अमेरिका, इस्त्राईल, इजिप्त यांचे राष्ट्रीय सुरक्षेतील व गुप्तचर यंत्रणेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये दीर्घकालीन वाटघाटी झाल्या. त्याला यश येऊन सुटकेचा आणि त्यादरम्यान शस्त्रसंधीचा निर्णय झाला. कतारचे अमीर शेख तमीम बीन हमद-अल थानी, इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फतेह अल-शिशी, अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन तसेच इस्त्राईलचे पंतप्रधान नेतान्याहू यांच्या कानापर्यंत सल्लामसलती जात होत्या आणि अखेरीस सुटकेचा मार्ग सुकर झाला.काही दिवसांपूर्वी झालेल्या दोन अमेरिकी महिलांच्या सुटकेने उभयपक्षी विश्वासाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, आपल्या भूमिकेपासून इस्त्राईल तसूभरही मागे हटायला तयार नाही. हमासचा निःपात हेच त्याचे उद्दिष्ट आहे.ही शस्त्रसंधी संपल्यानंतर गाझावासीयांना पुन्हा हल्ल्याला तोंड द्यावेच लागेल, अशी दर्पोक्ती नेतान्याहू यांनी केली आहे. खरे तर इस्त्राईलने युद्ध संपवण्याच्या दिशेने पावले टाकावीत, अशी जगभरातून मागणी आहे. ६८ टक्के अमेरिकी शस्त्रसंधीच्या बाजूने आहेत.वंशभेदाच्या आगीने होरपळलेल्या ज्यू नागरिकांनी पॅलेस्टिनींचा चालवलेला नरसंहार म्हणजे इतिहासातून धडा न घेता चालवलेली कारवाई, अशी टीका होत आहे. इस्त्राईलमध्ये सध्या नेतान्याहूंची लोकप्रियताही घटत आहे.इस्त्राईली जनमत युद्ध थांबवण्याच्या दिशेने वळत आहे. याची कारणे अनेक आहेत. इस्त्राईलच्या अर्थकारणाला ग्रहण लागत आहे. इस्त्रायलींना सेवा देणाऱ्या कंपन्या आणि इस्त्राईलकडून सेवा व तांत्रिक सहकार्य घेणाऱ्या कंपन्यांच्या कामकाजाचा खोळंबा होतो आहे.महत्त्वाचे म्हणजे कुशल मनुष्यबळ युद्धाच्या आघाडीवर गेल्याने कंपन्यांचे कामकाज विस्कळीत झाले आहे. अल-शिफा रुग्णालयाखालून हमासने बोगदे केले आहेत, तेथे त्यांची शिबंदी आहे, असे सांगत इस्त्राईलने त्यावर घृणास्पद हल्ला केला.इस्त्राईल आपल्या आरोपाच्या पुष्ट्यर्थ सज्जड पुरावा देऊ शकलेले नाही. सूडाचे हे चक्र थांबवणे व्यापक हिताचे आहे. शस्त्रसंधी तात्पुरती न राहता त्याद्वारे इस्त्राईल आणि हमास यांच्यात एकमेकांबाबत विश्वास कसा वाढवता येईल, याचे प्रयत्न अमेरिका व इतर मध्यस्थांकडून किती परिणामकारकरीत्या होतात, यावर शांतता अवलंबून आहे.शांततेच्या काळात उद्भवलेल्या समस्यांची सोडवणूक करण्याचा सर्वांत पळपुटा मार्ग म्हणजे युद्ध!

# कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणी करीता महसूल व पोलिस अधिकाऱ्यांचा वर्ग

## वरिष्ठ अधिकाऱ्यांना अर्धन्यायिक व दंडाधिकारी कामकाजाबाबत प्रशिक्षण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यघटनेला अभिप्रेत असलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, समाजात शांतता व सुव्यवस्था नांदावी तसेच गुन्हेगारीवर अंकूश लागावा, यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या सुचनेनुसार जिल्ह्यातील वरिष्ठ महसूल व पोलिस अधिका-यांचा विशेष वर्ग घेण्यात आला. यात अर्धन्यायिक व दंडाधिकारी कामाकाजाबाबत प्रशिक्षण देण्यात आले.वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर येथे पार पडलेल्या या एकदिवसीय प्रशिक्षण वर्गाला जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, वन अकादमीचे संचालक श्रीनिवास रेड्डी, विधी न न्याय विभाग नागपूर शाखेचे सहसचिव शेखर मुनघाटे, नाशिक येथील महाराष्ट्र पोलिस प्रशिक्षण अकादमीचे अधिवक्ता ङ संजय पाटील, उपविभागीय अधिकारी मुरुगानंथम एम. आदी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले,



जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी व कार्यकारी दंडाधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. त्यामुळे अशा प्रशिक्षणाच्या माध्यमातून आपल्या कायद्यांविषयक ज्ञानामध्ये भर घालून दैनंदिन कामकाजामध्ये त्याचा उपयोग करून घ्यावा. प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणा-यांविरुध्द प्रशासनाने कडक कारवाई करावी. त्यामुळे समाजात शांतता व सुव्यवस्था कायम राहण्यास मदत होईल. जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी म्हणाले, समाजविघातक कारवाया करणा-यांविरोधात उपविभागीय पोलिस अधिकारी कारवाई करतात. त्यांच्याकडे संबंधित पोलिस स्टेशनमार्फत परिपूर्ण प्रस्ताव येण्यासाठी अशा प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी यांना कायद्याविषयक प्रशिक्षित करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने येथे तज्ज्ञ व्याख्याते बोलाविले आहे, ही कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी सांगितले.विधी व न्याय शाखेचे सहसचिव श्री. मुनघाटे म्हणाले, कायद्याला ज्या गोष्टी अभिप्रेत आहे, त्याचा सर्वांगीण विचार करून अधिका-यांनी प्रभावी अंमलबजावणी करावी. तर तडीपारीची तसेच एम.पी.डी.ए. कायद्यांतर्गत करण्यात आलेली कारवाई उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात कशी टिकून राहील, याबाबत कायद्यांचा अभ्यास करावा, अशा सुचना अधिवक्ता संजय पाटील यांनी दिल्या.कार्यक्रमाचे संचालन उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार यांनी तर आभार निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील महसूल व पोलिस विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**प्रशिक्षणात या कायद्यांबाबत झाली चर्चा :**

**मुंबई पोलिस अधिनियम १९५१, मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९, महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१, अनुसूचिज जाती व जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम १९८९, अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ आदी कायद्यांबाबत यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.**

# शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना अटक:तुपकरांच्या अटके नंतर ठिकठिकाणी टायरची जाळपोळ; शेतकरी आक्रमक

**बुलढाणा**–कापसाला व सोयाबीनला योग्य हमी भाव मिळावा यासाठी २९ नोव्हेंबरला मंत्रालय ताब्यात घेऊ इच्छिणाऱ्या शेतकरी नेते रविकांत तुपकरांना पोलिसांना आज (शनिवार) दुपारच्या सुमारास बुलडाण्यात ताब्यात घेतले. तुपकरांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची बातमी जिल्ह्यात वाऱ्या सारख पसरली. त्यानंतर तुपकर यांच्या समर्थकांनी ठिकठिकाणी निषेध नोंदवण्यास प्रारंभ केले आहे.शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या अटकेचे पडसाद जिल्ह्यात ठिकठिकाणी उमटले. मुख्य मार्गावर टायर जाळून रास्ता रोको करण्यात आला. पोलिसांनी तुपकरांच्या अनेक कार्यकर्ते व समर्थकांना स्थानबद्ध केले. चिखली तालुक्यातील पेठ व त्यापाठोपाठ खामगाव तालुक्यातील अनेक गावांत टायर जाळून वाहतूक अडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी, शासनाच्या निषेधार्थ घोषणा देण्यात आल्या. पूर्वी आज शनिवारी दुपारी कडक बंदोबस्तात रविकांत तुपकरांना बुलढाणा शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्या निवासस्थानी ही कारवाई करण्यात आली.पोलिसांनी कलम १४९ नुसार नोटीस बजावल्यानंतरही रविकांत तुपकर आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम होते. त्यामुळे अधिकाऱ्यांनी ही बाब वरिष्ठ पातळीवर कळविली. त्यानंतर आदेश प्राप्त होताच बुलडाण्याचे पोलिस उपअधीक्षक गुलाबराव वाघ, ठाणेदार प्रल्हाद काटकर आपल्या ताफ्यासह तुपकर यांच्या निवासस्थानी दाखल झालेत. त्यांनी तुपकर यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, आंदोलनाच्या भूमिकेवर तुपकर ठाम राहिल्यानं त्यांना अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले.तुपकरांना ताब्यात घेताच त्यांची कन्या यज्ञजा त्यांना बिलगली. त्यामुळे तुपकर यांनी तिच्याशी काही क्षण संवाद साधला. 'आपल्याला शेतकऱ्यांसाठी मोठी लढाई लढायची आहे. त्यामुळे घाबरून चालणार नाही. असं होतच राहणार आहे. मी पण घाबरत नाही, तू पण घाबरू नको. मी लवकरच येतो. त्यानंतर आपण आणखी ताकदीनं शेतकऱ्यांसाठी लढूया', असे ते या वेळी कन्येला म्हणाले. पोलिस घरात आल्यापासून यज्ञजा आपल्या वडिलांजवळच होती. पोलिस तुपकर यांना घेऊन जात असताना ती पूर्णवेळ त्यांना बिलगूनच होती.रविकांत तुपकर म्हणाले की, सोयाबीन-कापूस उत्पादकांच्या प्रश्नावर आग्रही भूमिका घेत आपण बुलढाण्यात आंदोलन केले. आपल्या मागण्या मान्य झाल्या नाही तर मुंबईकडे कूच करून मंत्रालय ताब्यात घेण्याचा इशारा दिल्याने सरकारचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळेच नेहमीप्रमाणे पोलिसी बळाचा वापर करून मला बेकायदेशीरपणे अटक करवण्यात आली आहे. शेतकर्यांची एवढी प्रचंड ताकद पाहून शासन भेदरले असून मला अटक करण्याचा रडीचा डाव खेळला जात आहे.आपण सर्वांनी या आंदोलनाला बळ दिले,काही झाले तरी आंदोलन शमवायचे नाही. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी मी जीवात जीव असेपर्यंत लढत राहणार.



# माझ्यासोबत लढणारे सैन्य असल्याने राजकारणातील गद्दारांना गाडायला वेळ लागणार नाही–उद्धव ठाकरे

**मुंबई**–लढणारे सैन्य माझ्यासोबत असल्याने राजकारणातील गद्दारांना गाडायला मला वेळ लागणार नाही अशा शब्दात उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला. देशातच नाही, तर जगात जगात हिंदुहृदयसम्राट फक्त एकच, ते म्हणजे बाळासाहेब ठाकरे. संतापजनक म्हणजे पक्ष, नाव चोरणारे आता ही उपाधीही चोरायला बघत आहेत. अशांना राजकारणात गाडण्यासाठी मोठ्या प्रमाणात शिवसेनेत लोकं येत आहेत, असे विधान ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले. मुंबई, ठाणे, पालघरमधील शेकडो कार्यकर्त्यांचा आज शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी ते बोलत होते.कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, मी जास्त बोलत नाही. बोललो तर भाषण करावे लागेल. पालघर, ठाण्यातील लोकांनी पक्षात प्रवेश केला. असे दृश्य फार दुर्मिळ आहे.कारण सत्ताधारी पक्षाकडे लोक जात असतात. आज आपल्याकडे लोक



येतात. भगवा झेंडा आपल्याला कायम ठेवायचा असून परत फडकवायचा आहे. लवकरच पालघर मतदारसंघाचा दौरा करणार असून जाहीर सभा घेणार आहे. जनतेला काय पाहिजे हे राज्यकर्त्यांना कळत नसेल तर जनतेचा आवाज त्यांच्या कानापर्यंत कसा पोहोचवायचा हे शिवसेनेला चांगलेच माहिती असल्याचे ते म्हणाले.उद्धव ठाकरे म्हणाले की, मी कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नाही, वृत्तीविरोधात आहे. आपल्याला समोर दिसणारी हुकुमशाही आताच तोडूनमोडून टाकावी लागेल, नाही तर पुन्हा आपल्याला मान वर काढता येणार नाही. सर्वसामान्य माणूस कुणाचा तरी गुलाम बनून राहील. गुलामगिरी मला मान्य नाही आणि तुम्हालाही कुणाचा गुलाम होऊ देणार नाही, म्हणून मी लढायला उतरलो आहे.उद्धव ठाकरे म्हणाले की, आई एकविरेचे छत्र आपल्या डोक्यावर आहे. मला खात्री आहे आपण जिंकणार आहोत.माझे पालघर भागाकडे दुर्लक्ष झाले हे मला मान्य करावे लागेल. पोटनिवडणूक लढलो त्यानंतर लोकसभा झाली ती जिंकलो. येणाऱ्या निवडणुकीत भगवा झेंडा कायम ठेवायचा आहे. लवकरात लवकर मी पालघर मतदारसंघातील गाठीभेटींचा दौरा करणार आहे. जनतेला काय पाहिजे हे राज्य सरकारला कळत नसेल तर जनतेचा आवाज कसा पोहचवायचा हे शिवसैनिकांना चांगले कळते.

# दयानंद विधी महाविद्यालय येथे रक्तदान शिबिराचे आयोजन




**सोलापूर**–दयानंद विधी महाविद्यालय येथे भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून शनिवार दि. २५ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयाच्या आवारात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील विध्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदवला.डॉ.हेडगेवार रक्तपेढी संस्था सोलापूर संचलित डॉ.हेडगेवार रक्त केंद्र सोलापूर यांच्या सहकार्याने हा शिबिर घेण्यात आला.याशिबिरात रक्तपेढी संस्थेच्या वतीने प्रत्येक रक्तदात्यास कृतज्ञता प्रमाणपत्र देण्यात आले.तसेच महाविद्यालयाच्या वतीने प्रत्येक रक्तदात्यास संविधानाचे प्रत देऊन गौरविण्यात आले.यावेळी विधी महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ.सोनाली गायकवाड, डॉ.प्रा. दंतकाळे, प्रा.चलवादी, प्रा.देडे, प्रा.व्हटकर, प्रा.हिंगमीरे, प्रा.मलजी आदींची उपस्थिती होती.हे शिबीर यशस्वी करण्यासाठी विश्वनाथ मुडके, श्रीप्रसादअंकलगी, प्राविण्य सलगर, शाम आडम,चैतन्य केंगार, क्रांती सुरवसे, स्नेहा पवार केतकी शिंदे,चंदन माने,चेतन महाजन आदींनी परिश्रम घेतले.


# ना.मुनगंटीवार यांच्या हस्ते सार्वजनिक व घरगुती गणेशोत्सव स्पर्धा २०23 चे भव्य बक्षिस वितरण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री मा.ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून आयोजित सार्वजनिक व घरगुती गणेशोत्सव स्पर्धा २०२३ चे भव्य बक्षिस वितरण तसेच ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे आयोजन करणाऱ्या पदाधिका-यांचा सत्कार यावेळी करण्यात येणार आहे. तसेच मुंबईच्या कलावंतांचा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.दि. २७ नोव्हेंबर २०२३ रोजी भारतीय जनता पार्टी चंद्रपूर महानगर द्वारे गांधी चौक, महानगरपालिका पार्कींग येथे सायं. ०६ वा. सार्वजनिक व घरगुती गणेशोत्सव स्पर्धा २०२३ चे भव्य बक्षिस वितरण करण्यात येणार आहे.

चंद्रपूर शहरामध्ये सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये ५१ हजार ०१ रुपयाचे प्रथम पारितोषिक सार्वजनिक नवयुवक बाल गणेश मंडळ, दत्तनगर चंद्रपूर, ३१ हजार ०१ रुपयाचे द्वितीय पारितोषिक सार्वजनिक न्यु इंडिया युवक गणेश मंडळ, भानापेठ वार्ड, चंद्रपूर, २१ हजार ०१ रुपयाचे तृतिय पारितोषिक सार्वजनिक सार्वजनिक गणेश मंडळ, सिव्हील लाईन, चंद्रपूर यांना जाहीर करण्यात आला आहे. तसेच घरगुती गणेशोत्सव स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक घरगुती गणेश रविंद्रराव गिरीधर, बापट नगर, चंद्रपूर, द्वितीय पारितोषिक घरगुती शेषराव गहुकर, गोपालपुरी चंद्रपूर, तृतिय पारितोषिक घरगुती अशोक किसनराव नेवारे, घुटकाळा वार्ड, चंद्रपूर यांना जाहीर झाला आहे. त्यांना भेट वस्तू देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेमध्ये बल्लारपूर शहरातील ३१ हजार ०१ रुपयाचे प्रथम पारितोषिक सार्वजनिक न्यु संमित्र क्रीडा गणेश मंडळ, गांधी वार्ड, बल्लारपूर, २१ हजार ०१ रुपयाचे द्वितीय पारितोषिक सार्वजनिक श्री बाल गणेश मंडळ, महाराणा प्रताप वार्ड, बल्लारपूर, ११ हजार ०१ रुपयाचे तृतिय पारितोषिक सार्वजनिक श्री किल्ला वार्ड हनुमान बहुउद्देशिय संस्था व व्यायाम शाळा, किल्ला वार्ड, बल्लारपूर यांना जाहीर झाला आहे. घरगुती गणेशोत्सव स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक श्रीमती सोनाली मंगेश गोहणे, गांधी चौक, गांधी वार्ड, बल्लारपूर, द्वितीय पारितोषिक साहील नरेश



दासरवार, शिवाजी वार्ड, बल्लारपूर, तृतिय पारितोषिक किशोर नानाजी मोहुर्ले, महाराणा प्रताप वार्ड, बल्लारपूर यांना जाहीर झाला आहे. त्यांना भेट वस्तू देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेमध्ये मुल शहरातील ३१ हजार ०१ रुपयाचे प्रथम पारितोषिक सार्वजनिक गणेश मंडळ मुल, २१ हजार ०१ रुपयाचे द्वितीय पारितोषिक सार्वजनिक नेताजी गणेश मंडळ मुल, ११ हजार ०१ रुपयाचे तृतिय पारितोषिक सार्वजनिक सन्मीत्र गणेश मंडळ मुल यांना जाहीर झाला आहे. घरगुती गणेशोत्सव स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक अशोक आक्केवार मुल, द्वितीय पारितोषिक नयना जैन मुल, तृतिय पारितोषिक वसंत भगत मुल यांना जाहीर झाला आहे. त्यांना भेट वस्तू देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.यावेळी चंद्रपूर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांना ५००१ रुपयांचे १० प्रोत्साहनपर पारितोषिक, ३ घरगुती गणेशोत्सव प्रोत्साहन पारितोषिक तसेच बल्लारपूर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांना ५००१ रुपयांचे १० प्रोत्साहनपर पारितोषिक, १० घरगुती गणेशोत्सव प्रोत्साहन पारितोषिक देण्यात येतील. मुल शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांना ५००१ रुपयांचे ०५ पारितोषित, घरगुती गणेशोत्सव प्रोत्साहन ०५ पारितोषिक देण्यात येतील. ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर २४ ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. यामध्ये ३४७३ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले होते. या शिबिराचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल आयोजक पदाधिका-यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. या पारितोषिक वितरण कार्यक्रमामध्ये मुंबई येथील गर्जा महाराष्ट्र माझा हा ५० कलावंतांचा भव्य संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.यावेळी स्व.डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार यांच्या जयंती प्रित्यर्थ भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामधील १५ भजन मंडळांना सन्मानित करण्यात येणार आहे.या पारितोषिक वितरण सोहळ्यामध्ये वंदेभारत नृत्योत्सवाचे विजेते व २५ हून अधिक देशांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले बी.बी. परफॉर्मिंग आर्टस्, मुंबई सादर करणार आहेत. ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून तयार झालेल्या महिमा महाराष्ट्राचा, एकमेव महाराष्ट्र, गणराज रंगी नाचतो व उत्सव महाराष्ट्राचा हा कार्यक्रम पारितोषिक वितरणाची शोभा वाढविणारा ठरणार आहे.भारतीय जनता पार्टी महानगर जिल्हा चंद्रपूर द्वारे या पारितोषिक वितरण सोहळयामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे करण्यात आले आहे.

# ऊसतोड कामगार कृती समिती नेटवर्कची जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

युवा ग्राम विकास मंडळ कैज व ऊसतोड कामगार कृती समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय ऊसतोड कामगारांच्या समस्या संदर्भात बीड जिल्ह्यातील सामाजिक संस्था प्रतिनिधी, ,ऊसतोड कामगार, मुकादम ,युवक कामगार संघटना प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली आहे.बीड जिल्ह्यात ऊसतोड कामगारांसाठी टास्क फोर्स स्थापन करण्यात यावा. तसेच टोल फ्री क्रमांक सुरू करण्यात यावा ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची व महिलांच्या आरोग्यांची काळजी प्रशासनाने घ्यावी अशी मागणी करण्यात आली. बीड शहरात युवा ग्राम कैज व ऊसतोड कामगार कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कार्यशाळेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना शिक्षण हमी कार्ड देण्यात यावे ऊसतोड कामगारांचे स्थलांतर झाल्या नंतर गावात राहणाऱ्या वृद्धांसाठी कम्युनिटी किचनची व्यवस्था करावी. कारखाना स्तरावर मासिक आरोग्य तपासणी लसीकरण करण्यात यावे. ऊसतोड कामगारांना माहिती देणारे प निर्माण करण्यात यावे. ऊसतोड कामगारांच्या प्रत्येक कुटुंबाला आरोग्य किट देण्यात यावी. अशा विविध विषयावर चर्चा होऊन सदरील मागणीचे निवेदन जिल्हा प्रशासन व राज्य सरकारला जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांसाठी काम करणाऱ्या फोरम च्या वतीने देण्याचे ठरले. यावेळी कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून युवा ग्रामीण विकास मंडळाचे सर्वेसर्वा एच.पी देशमुख सर्व शिक्षा आंदोलनाचे दत्तामामा बारगजे, ऊसतोड कामगार संघटनेचे जीवन राठोड,ऊसतोड कामगार कृती समितीचे ओमप्रकाश गिरी,बाजीराव ढाकणे, बाजीराव गिरी सामाजिक संस्था प्रतिनिधी रोहिदास रोहिटे,गोवर्धन दराडे, बाबासाहेब कोकाटे, नितीन शिंदे,नेहा माळी, अभिमान खरसडे,विनोद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेच्या सुरुवातीस संतोष रेपे यांनी ऊसतोड कामगारांच्या धारूर व केस तालुक्यात केलेल्या कामाचा आढावा सर्वांसमोर मांडला ऊसतोड कामगार आणि बालविवाह प्रथा




याचे परस्पर नाते कसे आहे बालविवाह थांबवण्यासाठी ऊसतोड कामगारांना सामाजिक योजना व त्यांच्या उपजीविकाच्या प्रश्न सोडवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सामाजिक संस्था संघटने यांनी एकत्रित लढा द्यावा याबाबत माहिती सांगितली. युवा ग्रामचे प्रमुख एच पी देशमुख यांनी ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न व महिला आरोग्याच्या प्रश्नाबाबत सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. दत्ता बारगजे यांनी ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी प्राधान्याने प्रयत्न व्हावेत लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ अंतर्गत कार्यान्वित असलेल्या संत भगवान बाबा वस्तीग्रह योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यासाठी नेटवर्कच्या माध्यमातून नियमित पाठपुरावा करणे गरजेचे आहे असे मत मांडले.ओमप्रकाश गिरी या नेटवर्कच्या माध्यमातून सर्व शिक्षा अभियान अंतर्गत चालू असलेले ऊसतोड कामगारां च्या मुलांसाठी चे वस्तीग्रह यांना प्रतिदिन प्रति विद्यार्थी ३३ रुपये शासन अनुदान देते परंतु हे अनुदान कमी असल्याकारणाने त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही शासन एकीकडे शिवभोजन थाळी साठी ५५ रुपये प्रति व्यक्ती पैसा देते व विद्यार्थ्यांना प्रतिदिन तेहतीस रुपये दिले जातात ही तफावत शासनाने भरून काढावी व ऊसतोड कामगारांच्या मुलांना न्याय द्यावा यासाठी बीड जिल्ह्यातून गावागावातील ऊसतोड कामगारांच्या मुलांचे निवेदन जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व शासनाच्या मंत्री यांना देण्यात यावे यासाठी गावपातळीवर लोकांची संघटन बांधणी करणे गरजेचे आहे त्यासाठी आपण नेटवर्क म्हणून पुढाकार घेऊन पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांना भेट घेऊन त्यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्याचे कार्यशाळेत निश्चित करण्यात आले.प्रकाश काळे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

# भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिवपदी रवी उपासे यांची नियुक्ती

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

शहरातील भाजपाचे युवा कार्यकर्ते श्री रवी उपासे यांची भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली.विधानसभा क्षेत्राचे आमदार समीर कुणावार यांचे स्थानिक जनसंपर्क कार्यालयात आज श्री रवी उपासे यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले असून त्यांना पुढील कार्याकरीता ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते तसेच आ.समिर कुणावार यांनी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी आमदार समीर कुणावार,जिल्हा उपाध्यक्ष भाजपा किशोर दिघे, भाजपा युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकूर, प्रदेश महामंत्री अनुसूचित जमाती मोर्चा नितीनजी मडावी यांचेसह विधानसभा प्रमुख संजय डेहणे, भाजपा जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, ओबीसी जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे,



भाजपा शहर अध्यक्ष भूषण पिसे , हिंगणघाट तालुका अध्यक्ष विनोद विटाळे, समुद्रपूर तालुका अध्यक्ष वामन चंदनखेडे, समुद्रपूर भाजपा शहराध्यक्ष गजानन राऊत, नलिनी सयाम, रवीला आखाडे, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अमोल गवळी, ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष अनिल चापले , ज्येष्ठ पत्रकार माजी नगरसेवक तथा भाजपा जिल्हा चिटणीस किरण वैद्य, समाजसेवक सुनील डोंगरे, अनिता मावळे, महिला ग्रामीण तालुकाध्यक्ष कीर्ती सायंकार, विजया तेलरांधे, माजी नगरसेवक उमेश तुळसकर, देवेंद्र पडोळे, भाजपा आदिवासी जिल्हाध्यक्ष शंकर आत्राम, युवा मोर्चा शहराध्यक्ष सोनू पांडे, कवीश्वर इंगोले, हिंगणघाट नगरपरिषद माजी सभापती सोनू गवळी, विवेक चरडे, अक्षय थुटे इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ता गण उपस्थित होते.

# ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातून पंच मुखी हनुमान मंदिराचा होणार कायापालट

## विशेष बाब म्हणून १ कोटी ५० लक्ष रुपये मंजूर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष प्रयत्नामुळे पांढरकवडा (ता. चंद्रपूर) येथील श्री. पंचमुखी हनुमान मंदिराचा कायापालट होणार आहे. विशेष बाब म्हणून राज्य शासनाने या मंदिराच्या विकासासाठी १ कोटी ५० लक्ष रुपये मंजूर केले आहे.पांढरकवडा (ता. चंद्रपूर) येथील श्री. पंचमुखी हनुमान मंदीर हे 'क' वर्ग दर्जाचे तीर्थक्षेत्र असून या तीर्थक्षेत्राच्या मुलभूत सोयी-सुविधांसाठी १ कोटी ५० लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. याबाबतचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने शासनाकडे सादर केला. मात्र जिल्हास्तरावरील 'क' वर्ग तीर्थक्षेत्रांच्या



विकास कामासाठी ३० लक्ष रुपयांपर्यंत अर्थसंकल्पीय तरतुद करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना होते. या मर्यादेत आता वाढ करण्यात आली असून सदर निधीची मर्यादा ६० लक्ष रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. मात्र केवळ ६० लक्ष रुपयांत पांढरकवडा येथील पंचमुखी हनुमान मंदिराचा विकास होऊ शकत नाही, त्यासाठी आणखी निधी आवश्यक आहे, यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत वारंवार पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाले असून विशेष बाब म्हणून पंचमुखी हनुमान मंदिराच्या विकास कामांसाठी शासनाने १ कोटी ५० लक्ष रुपये मंजूर केले आहेत.वाढीव मंजूर निधीतून मंदिराचे विकास काम होणार असल्यामुळे याबाबत भाविकांनी ना.सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहे.

# जवाहर कॉलनीत गुणवंतांचा सत्कार

**पुलगाव । प्रतिनिधी**

पाल्यांना प्रोत्साहित करण्यासाठी व त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना चालना मिळावी, यासाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा जवाहर कॉलनी सत्कार समितीच्या वतीने कॉलनीतील गुणवंतांचा व कॉलनीतील ज्येष्ठ नागरिक यांचा सत्कार समारोहाचा कार्यक्रम नुकताच पार पडला.

या स्तुत्य उपक्रमाचे हे २१ वे वर्ष आहे.परिसरातील हनुमान मंदिराच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्माकरराव देशमुख होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.रमेश हुकूम,प्रा.नूरसिंग जाधव व वंदना प्रकाश नगराळे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री हनुमानजी च्या मूर्तीची तसेच मा शारदेच्या व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पूजा व हार अर्पण करून झाली. या कार्यक्रमामध्ये एसएससी परीक्षेत सर्वाधिक गुण घेणाऱ्या एकूण सहा विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पाच ग्रॅम चांदीचे मिडल, स्मृतिचिन्ह, ज्येष्ठ



नागरिकांसाठी शाल श्रीफळ,भेट वस्तू व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. यामध्ये ऋषी संजय गुप्ता, ध्रुव सुजित पांडे, कृतिका प्रशांत इंगोले,प्रेरणा संदीप बगाडे,आर्यन राजकुमार साहू,अनस शब्बीर खान या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच कॉलनीतील ज्येष्ठ नागरिक म्हणून मधुकरराव बोधनकर यांचा तर आर के हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय या संस्थेच्या मुख्य समन्वयक पदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रा.नूरसिंग जाधव यांचा आणि डॉ. हेडगेवार ग्रामीण अकृषक सहकारी पतसंस्था नाचणगाव या संस्थेवर संचालक पदी निवडून आल्याबद्दल देवरावजी नरड यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण विनायक नागतोडे यांनी केले.या कार्यक्रमात मधुकरराव बोधनकर, वंदना प्रकाश नगराळे,प्रा. रमेश हुकुम व प्रा.नूरसिंग जाधव यांनी देखील मनोगत व्यक्त केले व कार्यक्रमाला सन्मानपूर्वक बोलवल्याबद्दल आणि सत्कार केल्याबद्दल आभार व्यक्त केले.शेवटी जवाहर कॉलनी सत्कार समितीच्या वतीने आयोजित या स्तुत्य उपक्रमाला जनतेचा अजून प्रतिसाद मिळावा, असे मत आपल्या अध्यक्षीय भाषणातून पद्माकरराव देशमुख यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन दत्ताजी पाटोळे यांनी केले तर तर उपस्थितांचे आभार रुपेश कुडूपले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता लक्ष्मण श्रीरामे,प्रा. रामसिंग राठोड, शितल जावंधिया, सुनील यावलकर, ज्ञानेश्वर देशमुख, राजकुमार साहू, सरोदे, कोठे, सुरेश कांबळे संजय गुप्ता, प्रशांत इंगोले यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अंतर्गत कॉलनीतील लहान मुला मुलींचा एकल तसेच समूह नृत्याचा कार्यक्रम संपन्न झाला व त्यानंतर कॉलनीतील उत्साही गायकांनी कराओके साँग वर फिल्मी गीते सादर करून सांस्कृतिक कार्यक्रमात अधिक भर पाडला.या कार्यक्रमाला कॉलनीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषि शासन शेतकरी उत्पादक कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न




**बीड । प्रतिनिधी**

कृषि शासन शेतकरी उत्पादक कंपनीची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा संजय शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यामध्ये कंपनीने मागील एका वर्षाचा लेखा जोखा, कंपनीच्या कार्य अहवालाचे व ३०१ सभासद झाल्याची माहिती कंपनीचे मुख्यकार्यकारी अधिकारी अजित हराळे यांनी दिली. शिंदे यांनी शेतकरी यांना देण्यात येणाऱ्या सेवा व उत्पादन वाढ आणि मुल्यवृध्दीसाठी कशी कार्यरत आहे याची माहिती दिली. कंपनीने ऑनलाईन सेवा आणि कृषि सेवा केंद्र अल्प दरात उपलब्ध करून दिलेल्या आहेत तसेच उत्पादन वाढीसाठी सेवा व भाववाढीचे केलेले प्रयत्न यावर फोकस करण्यात आले आहे. भविष्यात कंपनी स्वताच्या जागेत असेल आणि १००० शेतकऱ्यांना सेवा देईल असे शिंदे यांनी सांगितले. यावेळी प्रा. सुहास पंके, दीन दयाळ कृषि विज्ञान केंद्र दिगोळ अंबा हे अथिती म्हणून मार्गदर्शन केले. वर्षभरात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या वैजिनाथ कदम, शंकर काळे, दत्ता कानडे, मेघराज काळे, विश्वनाथ सातपुते यांचा गौरव करण्यात आला. तसेच संचालक संदीपान मस्के, लक्ष्मण जाधव, अमोल सावंत, दत्ता कानडे व सभासद १७६ संभासद उपस्थित होते.

# राज्यस्तरीय एकपात्री नाट्य प्रयोग स्पर्धेत मुलची किमया प्रथम

**मूल । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग समग्र शिक्षा अभियान अंतर्गत शालेय शिक्षण व साक्षरता विभाग आणि एनसीईआरटी नवी दिल्ली, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय



कला उत्सव दिनांक २१ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर या कालावधीत महात्मा फुले राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये राज्यस्तरीय एकपात्री नाट्य प्रयोग स्पर्धेत राज्यातून मूल येथील माउंट कॉन्व्हेंट ची विद्यार्थिनी कु. किमया किरण खोब्रागडे,राज्यातून प्रथम क्रमांक पटकावला असून राष्ट्रीय स्पर्धेकरिता निवड झालेली आहे.

# मकरंद अनासपूरे आणि तेजस्विनी लोणारी यांची दमदार जोडी असणारा 'छापा काटा' चित्रपटाचा पोस्टर लाँच!

**मुंबई**–महाराष्ट्राचे फेवरेट अभिनेते मकरंद अनासपूरे आणि तेजस्विनी लोणारी नव्या कोऱ्या 'छापा काटा' चित्रपटातून धमाकेदार भूमिकेत येत आहेत. 'अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड' प्रस्तुत 'छापा काटा' धमाल विनोदी चित्रपटाचा २१ नोव्हेंबर २०२३ रोजी दणक्यात पोस्टर लाँच झाला असून रसिक प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहचली आहे. चित्रपट १५ डिसेंबर २०२३ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून प्रेक्षकांना चित्रपटगृहात भन्नाट मनोरंजन अनुभवता येणार आहे.'ढ लेकाचा' 'कुलस्वामिनी' 'बोल हरी बोल' आणि 'हिरा फेरी' या सुपरहिट चित्रपटांनतर श्री. सुशीलकुमार अग्रवाल यांनी 'छापा काटा' चित्रपटाची निर्मिती केली असून संदीप मनोहर नवरे यांनी पटकथा आणि दिग्दर्शन केले आहे. चित्रपटात मकरंद अनासपूरे आणि तेजस्विनी लोणारी यांच्यासोबत मोहन जोशी, अरुण नलावडे, ऋतुराज फडके, पंकज विष्णु, सुश्रुत मंकणी, रीना अग्रवाल आणि विजय पाटकर हे सुप्रसिद्ध अभिनेते प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन करणार आहेत. या सर्व अभिनेत्यांची




झलक असणारा चित्रपटाचा पोस्टर चित्तवेधक असून प्रेक्षकांना जबदरस्त आकर्षित करत आहे.

# चंद्रपूर शहरातील प्रलंबित बायपाससाठी १ डिसेंबरला एकदिवशीय धरणे आंदोलन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख औद्योगिक शहर आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था कोलमडून पडली आहे. शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बायपास काढण्याचा प्रस्ताव मंजूर झाला होता. परंतु, प्रकल्प अद्यापही प्रलंबित आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी तातडीने करण्याची मागणी भूमिपुत्र संघटनेने केली आहे.या मागणीला पाठिंबा देण्यासाठी भूमिपुत्र संघटनेने १ डिसेंबर २०२३ रोजी जिल्ह्याधिकारी कार्यालयासमोर दुपारी १२ ते ३ एकदिवशीय धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनाचे नेतृत्व भूमिपुत्र संघटनेचे संयोजक दिनेश दादापाटील चोखारे करणार आहेत.

काँग्रेस नेते व भूमिपुत्र संघटनेचे संयोजक दिनेश दादापाटील चोखारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले होते. त्यात त्यांनी म्हटले आहे की, चंद्रपूर शहराच्या मध्यभागातून राष्ट्रीय महामार्ग जातो. या महामार्गावरून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. यामुळे शहराच्या मध्यभागी



वाहतूक कोंडी होत असते. या कोंडीमुळे वाहनचालकांना अनेक तास थांबावे लागतात. यामुळे नागरिकांना आर्थिक आणि मानसिक त्रास होत आहे.चंद्रपूर शहराच्या बाहेरून बायपास काढण्याचा प्रस्ताव मंजूर झाला होता. परंतु, अद्यापही या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झालेली नाही. बायपास रस्ता झाल्यास शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही. तसेच, शहराची वाहतूक व्यवस्था सुव्यवस्थित होईल.या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री शिंदे यांनी चंद्रपूर शहराच्या बायपास प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्यासंदर्भात आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.चंद्रपूर शहरातील वाहतूक कोंडी ही एक गंभीर समस्या आहे. या प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी झाल्यास शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मदत होईल.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .